आर.बी.आय./ २००९-१०/१४
डी.एन.बी.एस(पी.डी.एम.जी.सी.)सी.सी.नं. ४ / २३.११.०१ / २००९-१०

जुलै १, २००९

प्रति,
सर्व कंपनी अध्यक्ष/मुख्य अधिकारी तारण हमी कंपन्या (मॉर्गेज गॅरंटी),

महोदय,

मुख्य परिपत्रक - तारण हमी कंपन्या (मॉर्गेज गॅरंटी कंपन्या)

आपल्याला माहिती आहे की या विषया वरील सर्व चालू सूचना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात म्हणून रिझर्व बँकेने या विषयावर मुख्य परिपत्रक जारी केले आहे ते ३० जून २००९ पर्यंत अद्यातन केले आहे. सूचीमध्ये दाखवलेल्या तारण हमी कंपन्यांबाबतच्या सर्व सूचना या मुख्य परिपत्रकात एकत्र केल्या आहेत व अद्यतन केल्या आहेत. मुख्यपरिपत्रक रिझर्व बँकेच्या संकेत स्थळावर (http://www.rbi.org.in) उपलब्ध आहेत. सुधारित मुख्य परिपत्रकाची प्रत जोडत आहे.
आपला विश्वासू

(पी. कृष्णमूर्ती)

प्रभारी मुख्य महाप्रबंधक

सूची -

तारण हमी कंपन्यांना गैर बँकिंग वित्तीय कंपन्यांसारखी वागणूक देणे.

| अनुक्रमांक | विवरण | जारी करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | सूची क्र. डी.एन.बी.एस(एम.जी.सी.)१/सी.जी.एम(पी.के.)-२००८ | जानेवारी १५, २००८ |

२००८ तारण हमी कंपन्या (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २००८

| अनुक्रमांक | विवरण | जारी करण्याची तारीख |
|---|---|---|
| २ | सूची क्र. डी.एन.बी.एस(एम.जी.सी.)३ / सी.जी.एम(पी.के.)-२००८ | जानेवारी १५, २००८ |

मॉर्गेन गॅरंटी कंपनीज् प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश, २००८

| अनुक्रमांक | विवरण | जारी करण्याची तारीख |
|---|---|---|
| ३ | सूची क्र. डी.एन.बी.एस(एम.जी.सी.)४/सी.जी.एम(पी.के.)-२००८ | जानेवारी १५, २००८ |

मॉर्गेन गॅरंटी कंपनीज् इन्व्हेस्टमेंट (रिझर्व बँक) निदेश, २००८

| अनुक्रमांक | विवरण | जारी करण्याची तारीख |
|---|---|---|
| ४ | सूची क्र. डी.एन.बी.एस(एम.जी.सी.)५ / सी.जी.एम(पी.के.)-२००८ | जानेवारी १५, २००८ |

**भारतीय रिझर्व बँक**
**अबँकीय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर कफ परेड**
**कुलाबा - मुंबई ४००००५**

सूची क्र. डी.एन.बी.एस(एम.जी.सी.) १ / सी.जी.एम(पी.के.) -२००८ दि. जानेवारी १५, २००८

भारतीय रिझर्व बँक कायद्याचा १९३४ (१९३४ चा २ कायदा) कलम ४५ (आय.(एफ)(iii) मधील

मधील प्रदत्त अधिकारानुसार व केंद्र सरकारच्या पूर्व अनुमतीनुसार रिझर्व बँकेला आवश्यक वाटल्यानुसार रिझर्व बँक असे जाहीर करते की तारण हमी कंपनी म्हणजे जी कंपनी बँकेने सूचीत केलेल्या तारण हमी कंपनी नोंदणीच्या योजनेखाली नोंदणीकृत असेल त्या कंपनीला या कायद्यानुसार गैर बँकिंग वित्तीय कंपनी म्हणून समजले जाईल.

(पी. कृष्णमूर्ती)

प्रभारी मुख्य महाप्रबंधक

**भारतीय रिझर्व बँक**
**अबँकीय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर कफ परेड**
**कुलाबा - मुंबई ४००००५**

सूची क्र. डी.एन.बी.एस(पी.डी)एम.जी.सी.नं.३/सी.जी.एम(पी.के.)-२००८ दिनांक फेब्रूवारी १५,२००८

१. रिझर्व बँक १९३४च्या कलम ४५ एल(१)(ब) अंतर्गत तारण हमी कंपन्यांच्या नोंदणीकरणासाठी व कामकाजासाठीची मार्गदर्शक तत्वे. रिझर्व बँकेने सूचीपत्र क्रमांक सूची क्र. डी.एन.बी.एस(एम.जी.सी.)१/सी.जी.एम(पी.के.)-जानेवारी १५, २००८ या नुसार रिझर्व बँक कायदा १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ आय (एफ.) (iii) अंतर्गत जारी केलेल्या रिझर्व बँकेला आवश्यक वाटले की या कायद्याच्या कलम ४५ एल(१) (ब) अंतर्गत प्रदत्त अधिकारानुसार तारण हमी कार्य हातात घेणाऱ्या प्रत्येक गैर बँकिंग वित्तीय कंपनीसाठी खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे पालन करणे आवश्यक आहे.

१. संक्षिप्त शीर्षक, सुरुवात व मार्गदर्शक तत्वे केंव्हा लागू होतात.

(i) या मार्गदर्शक तत्वांना तारण हमी कंपनी (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २००८ असे म्हटले जाईल.

(ii) ही तत्वे तात्काल प्रभावानुसार लागू होतील.

**आवाका**

(iii) या मार्गदर्शक तत्वांमध्ये भारतातील तारण हमी कंपन्यांचे नोंदणीकरण व कार्यपद्धती याची चौकट घालून दिली आहे.

**व्याख्या**

२ (१) संदर्भासाठी अन्य अर्थ आवश्यक नसल्यास

(अ) बँक म्हणजे

(i) बँकिंग कंपनी किंवा

(ii) तत्सम नवी बँक किंवा

(iii) भारतीय स्टेट बँक किंवा

(iv) सवसिडरी बँक किंवा

(v) रिझर्व बँक या मार्गदर्शक तत्वांसाठी सूचीत करील अशी बँक व

(iv) बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ (१९४९ चा १०) अंतर्गत सहकारी बँक

(ब) बँकिंग कंपनी म्हणजे बँकिंग नियंत्रण कायदा १९४९ (१९४९ चा १०) अंतर्गत व्याख्या केलेली बँकिंग कंपनी

(क) कर्जदार म्हणजे अशी व्यक्ती किंवा संस्था की जिला रिझर्व बँकेने निदर्शित केलेल्या कर्जदार संस्थेने किंवा कोणत्याही संस्थेने गृहकर्ज दिले आहे.

(ड) कर्जदार संस्था म्हणजे बँक किंवा गृह वित्त कंपनी

(इ) कंपनी म्हणजे कंपनी कायदा १९५६ च्या कलम ३ मध्ये नोंदणीकृत कंपनी

(एफ) तत्सम नवी बँक म्हणजे बँकिंग नियंत्रण कायदा कलम ५(ड)(अ) मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार.

(ग) "पैसे वेळेवर न भरणे" म्हणजे कोणत्याही कर्जदाराने संस्थेला ठरलेल्या तारखेला मुद्दल वा व्याज न देणे.

(ह) "हमी" म्हणजे भारतीय करार कायदा १८७२ (१८७२ चा ९ वा) नुसार हमीचा करार (आय) गृह वित्त कंपनी म्हणजे जी कंपनी मुख्यतः गृह वित्त कर्जाचा व्यवसाय करते किंवा ज्या कंपनीचे राष्ट्रीय गृह वित्त कायदा १९८७ मध्ये दिल्याप्रमाणे घरासाठी वित्त पुरवठा करणे हे महत्वाचे उद्दिष्ट असते.

(ज) गृहकर्ज म्हणे घर किंवा रहाण्याची मालमत्ता बांधण्यासाठी/दुरुस्ती करण्यासाठी/नूतनीकरणासाठी किंवा विकत घेण्यासाठी रिझर्व बँकेने ठरवल्याप्रमाणे व्यक्तीला किंवा इतर संस्थेला रिझर्व बँकेने वेळोवेळी ठरवल्याप्रमाणे दिलेले कर्ज किंवा अग्रीम रक्कम स्पष्टीकरण या व्याख्येत इतर संस्था म्हणजे गृह संस्था व सहकारी गृहसंस्था यांचा गृहकर्ज या व्याख्येत समावेश होतो.

(के) तारण हमी म्हणजे तारण हमी कंपनीने गृहकर्जाची रक्कम व व्याज देय झाल्यावर त्याची कर्ज देणाऱ्याला परत फेडीची दिलेली हमी.

(ल) "तारण हमी कंपनी" म्हणजे अशी कंपनी जी प्रामुख्याने तारण हमी देण्याचा व्यवसाय करते

(म) “तारण हमी करार” म्हणजे कर्ज घेणारा, कर्ज देणारा व तारण हमी कंपनी या मधील असा त्रिपक्षिय करार, की ज्यामध्ये तारण हमी कंपनी तारण हमी देते.

(न) “राष्ट्रीय गृह बँक” म्हणजे राष्ट्रीय गृह बँक कायदा १९८७ (१९८७ चा ५३) या कायद्याखाली स्थापलेली राष्ट्रीय गृह बँक

(ओ) “निव्वळ स्वतःचे धन” म्हणजे तारण हमी कंपन्यासाठीच्या तारतम्य दंडकामध्ये दिलेल्या प्रमाणे.

(प) “कार्य न करणारी मालमत्ता” म्हणजे रिझर्व बँक किंवा राष्ट्रीय गृह बँकेने मालमत्ता वर्गीकरणाबाबत घालून दिलेल्या आदेश किंवा मार्गदर्शक तत्वांनुसार पतसंस्थेने ज्या कर्जदारांची खाती कमी दर्जाची किंवा संशयास्पद किंवा तोट्यात जाणारी मालमत्ता अशी वर्गीकृत केली आहे ती मालमत्ता.

(क्यू) “रिझर्व बँक” म्हणजे रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ (१९३४ चा २) या कायद्याखाली स्थापन झालेली रिझर्व बँक.

(र) “महत्वपूर्ण स्वारस्य” म्हणजे एखाद्या व्यक्तीने किंवा त्याच्या पती/पत्नीने किंवा अवयस्क मुलाने, एकट्याने किंवा एकत्रित कंपनीच्या भागभांडवलात घेतलेले स्वारस्य की जे त्या कंपनीच्या भरलेल्या भागभांडवलाच्या १०% पेक्षा जास्त आहे किंवा भागीदारी संस्थेच्या भागीदारांनी दिलेल्या भांडवलाच्या १०% पेक्षा जास्त असेल.

(स) “घडवणारी घटना” म्हणजे कर्जदाराच्या खात्याचे कर्ज देणाऱ्या संस्थेने लेखा खात्यामध्ये “कार्य न करणारी मालमत्ता” म्हणून केलेले वर्गीकरण

(ट) “उलाढाल किंवा व्यवसाय उलाढाल” म्हणजे त्या वर्षामध्ये तारण हमीचा एकूण केलेली उलाढाल अधिक रिझर्व बँकेने परवानगी दिलेल्या व्यवसायातील एकूण उलाढाल.

२.(२) यामध्ये वापरलेले शब्द किंवा एक्सप्रेशन की ज्यांची व्याख्या दिली नाही अशांची व्याख्या जर कंपनी कायदा १९५६ (१९५६ चा १) किंवा चार्टर्ड अकाउंटंस ऑफ इंडियाने जारी केलेल्या लेखा मार्गदर्शक तत्वामध्ये व्याख्या दिली असेल तर ती येथे ग्राह्य धरावी.

**रिझर्व बँकेकडे नोंदणी करणे.**

३.खालील गोष्टींची पूर्तता झाल्यावर तारण हमी कंपनी तारण हमी देण्याचा व्यवसाय करु शकेल (१) रिझर्व बँकेकडून नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर

(२) स्वतःचे निव्वळ धन एक कोटी रुपये किंवा रिझर्व बँक त्यापेक्षा अधिक ठरवेल तर तेवढे असले पाहिजे.

४. प्रत्येक तारण हमी कंपनी रिझर्व बँकेने ठरवलेल्या स्वरुपामध्ये बँकेला नोंदणी साठी अर्ज करील.

५. या अर्जाचा विचार करण्यासाठी रिझर्व बँक खालील गोष्टींची पूर्तता झाली आहे की नाही हे पाहील.

(अ) तारण हमी कंपनी प्रामुख्याने तारण हमी देण्याचा व्यवसाय करील. ज्या वेळी एकूण व्यवसाय उलाढालीच्या किमान ९०% उलाढाल ही तारण हमी उलाढाल आहे किंवा या व्यवसायातून आलेली आय ही एकूण आयच्या किमान ९०% आहे. यामध्ये तारण हमी योजनेतून आलेली आय गुंतवून त्यावर आलेल्या रकमेचा समावेश आहे

(ब) सदर तारण हमी कंपनी हमीच्या करारांमुळे उदभवलेल्या देयतांची पूर्तता करण्यासाठी सक्षम आहे.

(क) या तारण हमी कंपनीची भांडवल चौकट ही परिच्छेद ११ ते १३ प्रमाणे पुरेशी आहे व या व्यवसायामध्ये त्यांना पुरेसा पैसा मिळण्याची शक्यता आहे

(ड) या कंपनीचे व्यवस्थापन किंवा प्रस्तावित व्यवस्थापन हे सार्वजनिक हिताच्या विरुद्ध नाही

(इ) अशा तारण हमी कंपनीच्या निदेशक मंडळाचे सदस्यांपैकी निम्म्यापेक्षा जास्त सदस्य भागधारकाचे नामनिर्देश केलेले किंवा ज्या भागधारकांना कंपनीत महत्वपूर्ण स्वारस्य आहे अशांशी संबंधित असता कामा नयेत. जर कंपनी असा भागधारक असेल तर

(फ)(i) तारण हमी कंपनीचे भागधारकत्व विस्तृतपणे पसरले असेल

(ii) तारण कंपनी कोणत्याही कंपनीची (भारता बाहेरच्या कायद्यानुसार स्थापित झालेल्या कंपनी सकट) उपकंपनी असता कामा नये.

(iii) कोणतीही व्यक्ती, संघटना किंवा व्यक्तींचा समूह (संघठित किंवा असंघठित) भागीदारी संस्था किंवा भारता बाहेरील कायद्याखाली नोंदणीकृत कंपनी यांच्याकडे तारण हमी कंपनीचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण असता कामा नये.

(ग) तारण हमी कंपनीच्या भाग भांडवलामध्ये गुंतवणूक करण्यासाठी परकीय थेट गुंतवणूकीला पात्रता हवी असल्यास त्यासाठी एफ.आय.पी.बी. ची पूर्व परवानगी आवश्यक आहे. अशी एफ.आय.पी.बी. /एफ.इ.डी. ची परवानगी मिळवलेल्या परदेशी संस्थेला जर अर्जदार तारण हमी कंपनीमध्ये महत्वपूर्ण स्वारस्य असेल तर त्यावर देशांर्तगत आर्थिक संस्थेचे नियंत्रण असणे आवश्यक आहे व असे नियंत्रण करणारी संस्था शक्यतो तारण हमी कंपनी असावी व त्यांचा व्यावसायिक इतिहास उत्तम असावा. परंतु जर तारण हमी कंपनी मध्ये गुंतवणूक करणारी संस्था जर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था असेल तर हे कलम लागू नाही.

(ह) तारण हमी कंपनीला भारतात व्यवसाय सुरु करण्यासाठी किंवा चालू करण्यासाठी नोंदणीपत्र देऊन सार्वजनिक हित साधले जाईल.

(इ) नोंदणी प्रमाणपत्र देणे हे देशातील गृह वित्त व्यवसायाच्या हिताच्या विरोधात असणार नाही (ज) तारण हमी कंपनीने परदेशी गुंतवणूकी संबंधीच्या दंडकांची पूर्तता केली आहे

(क) अशा कोणत्याही अटीची पूर्तता की जी रिझर्व बँकेच्या मतानुसार भारतामध्ये तारण हमी व्यवसाय करण्यासाठी सार्वजनिक हिताच्या विरुद्ध नाही, तसेच गृह वित्त व्यवसायाच्या हिता विरुद्ध नाही.

६. उपरोक्त परिच्छेद ५ मधील अटींची पूर्तता झाल्यावर आवश्यकता वाटल्यास आणखी काही अटींची पूर्तता करण्याच्या अटींवर रिझर्व बँक नोंदणी पत्रक देईल.

७. तारण हमी कंपनीवर रिझर्व बँकेचे नियामक व निरीक्षणात्मक नियंत्रण राहील.

८. खालील स्थितीमध्ये रिझर्व बँक तारण हमी कंपनीचे नोंदणी पत्रक रद्द करील जर ती कंपनी (अ) भारतामध्ये तारण हमी देण्याचा व्यवसाय करणे थांबवेल

(ब) कंपनीने नोंदणीपत्रक देताना घातलेल्या अटींची पूर्तता केली नाही तर

(क) तारण हमी कराराद्वारे उत्पन्न झालेल्या देयतांची पूर्तता केली नाही तर

(ड) परिच्छेद ५ व ६ मधील अटींची पूर्ण केल्या नाही तर

(ई) खालील गोष्टी करण्यात कमी पडल्यास --

(i) रिझर्व बँकेने दिलेल्या आदेशांचे पालन करणे

(ii) रिझर्व बँकेने घालून दिलेल्या आदेशानुसार किंवा कोणत्याही कायद्यानुसार किंवा आदेशानुसार लेखा पुस्तके ठेवणे, प्रसिद्ध करणे इत्यादी

(iii) रिझर्व बँकेने मागीतल्यावर खातेपुस्तके किंवा इतर कागदपत्रके तपासणीसाठी देणे.

**तारण हमीची ठळक वैशिष्ट्ये**

९. तारण हमी कराराची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे :

(अ) तो भारतीय करार कायदा १८७२ च्या कलम १२६ नुसार हमीचा करार असेल

(ब) तारण हमी विनाअट व परत न घेण्यासारखी असेल व ते भारतीय करार कायदा १८७२ नुसार धाकदपटशाही, दडपण, फसवणूक, चुकीचे प्रतिपादन व/किंवा चूक या पासून मुक्त असेल. (क) ती हमीच्या रकमेपर्यंत गृहकर्ज खात्यातील मुद्दल व व्याज या साठी असेल.

(ड) हमीदार कंपनी तारण कर्जाच्या येणाऱ्या रकमेबरोबर जुळणी न करता हमी दिलेली रक्कम अदा करेल.

(इ) तारण हमी हे कर्जदार, कर्ज देणारी संघटना व हमीदार कंपनी यांचा त्रिपक्षिय करार असेल.

१०.तारण हमी कंपनी विमा व्यवसाय करु शकणार नाही.

**किमान भांडवल आवश्यकताः**

११. व्यवसायाची सुरुवात करताना तारण हमी कंपनीकडे स्वतःचे निव्वळ धन किमान १०० कोटी रुपये असले पाहीजे. ३ वर्षानंतर त्यात किती वाढ करायची हे ठरवता येईल.

**भांडवल पूर्तताः**

१२. तारण हमी कंपनी १०% चे भांडवल पूर्तता गुणोत्तर ठरवेल. हे गुणोत्तर ताळेबंदातील एकूण जोखीम मालमत्तेच्या जुळणीकृत किंमत व ताळेबंदा बाहेरच्या मालमत्तेच्या जोखीम जुळणीकृत किमतीचे असेल. हे १०% किंवा रिझर्व बँक वेळोवेळी ठरवेल ते असेल.

१३ .तारण हमी कंपनी किमान भांडवल म्हणून ताळेबंदातील एकूण जोखीम मालमत्तेच्या जुळणीकृत किंमत व ताळेबंदा बाहेरच्या एकूण जोखीम मालमत्तेच्या जुळणीकृत किंमत यांच्या ६% एवढी रक्कम ठेवेल.

**तारतम्य दंडक व लेखा दंडक -**

१४. तारण हमी कंपनीला विविध प्रकारचे तारतम्य दंडक व लेखा दंडक पाळावे लागतील. हे दंडक आय ओळखणे, मालमत्तेचे वर्गीकरण, तरतूद करणे, गुंतवणूकीचे वर्गीकरण व त्यांची किंमत काढणे तसेच प्रूडेंशीयल एक्सपोजर बाबत रिझर्व बँकेने वेळोवेळी जारी केलेल्यानुसार असतील.

१५. चार्टर्ड अकाऊटंट इन्स्टीटयुट वेळोवेळी जारी केलेले लेखा दंडक व मार्गदर्शक तत्वांचेही तारण हमी कंपनीला पालन करावे लागेल

१६. कोणतीही एक हमी कंपनीच्या स्तर १ व स्तर २ भांडवलापेक्षा जास्त असता नये.

**पैसे उभे करण्याचे पर्याय**

१७.(१) **जनतेकडून ठेवी गोळा करणे** - तारण हमी कंपन्या जनतेकडून ठेवी गोळा करु शकणार नाहीत.

१७.(२) **बाह्य व्यापारीक कर्जे** - तारण हमी कंपन्या बाह्य व्यापारीक कर्जे घेऊ शकणार नाहीत.

**राखीव निधी निर्माण करणे व ठेवणे**

**आकस्मिक निधी :**

१८.तारण हमी कंपनी कायम असा आकस्मिक निधी निर्माण करील व ठेवील अशी कंपनी

(अ) वर्षाचा मिळालेल्या एकूण प्रिमियम किंवा फी च्या ४०% किंवा निव्वळ फायद्याच्या (कर व प्रावधान केल्या नंतर) २५% या पैकी जे जास्त असेल ते असा निधी म्हणून दरवर्षीठरवून ठेवेल (ब) कमी फायदा झाल्यास ही ठरावीक रक्कम पुढे नेलेला तोटा वाढवील

(क) जर एखाद्या वर्षात पूर्तता केलेले दावे एकूण मिळालेल्या प्रिमियम किंवा फीच्या ३५% पेक्षा जास्त असेल तर त्या वर्षी कमी टक्केवारी आकस्मिक निधीमध्ये अंतरित करील.

(ड) असा आकस्मिक निधी एकूण तारण हमी देयतेच्या किमान ५% तरी असेल याची पूर्तता करील.

(इ) अशी बाजूला काढून ठेवलेली रक्कम किमान ७ वर्षे ठेवण्यात येईल व आठव्या वर्षात कलम १८ (ड) ची पूर्तता केल्यावर ती उलट करता येईल.

(फ) या निधीचा वापर रिझर्व बॅंकेच्या पूर्व परवानगीनेच करता येईल.

(ग) हा राखीव निधी ताळेबंदाच्या देयता बाजूला वेगळा दाखवण्यात येईल मात्र हा निधी निव्वळ मालकीचे धन याचा हिशेब करण्यासाठी मुक्त निधी म्हणून धरला जाईल.

**न मिळवलेल्या प्रिमियमचा हिशेबः**

१९. इन्स्टीटयुट आफ चार्टर्ड अकाऊटंटने घालून दिलेल्या लेखा मानकानुसार तारण हमी योजना कंपनी तारण हमी कराराच्या प्रिमियमचा किवा फी चा हिशेब करील. न मिळवलेला प्रिमियम ताळेबंदाच्या देयता बाजूला वेगळा दाखवला जाईल.

**मागवलेल्या हमीवर झालेल्या तोटयासाठीची तरतूदः**

२०. जेव्हा हमी रक्कम मागवली जाते तेंव्हा तारण हमी कंपनीला तोटा होण्याची शक्यता असते. अशा बाबतीत कंपनी मालमत्तेची वसूली होईपर्यंत तोटयाची तरतूद करुन ठेवेल. अशा तऱ्हेची तरतूदीची रक्कम हा मागवल्या हमीच्या रकमे बरोबर कंपनीकडे गृहकर्जा बाबत असलेल्या मालमत्तेच्या किमतीच्या रकमेची जुळणी केल्यावर उरणारी रक्कम इतकी असेल. जर परत मागवलेल्या हमीबाबतच्या मालमत्तेची वसूल होणारी किंमत मागवलेल्या हमीच्या किमतीपेक्षा जास्त असेल तर जास्तीची रक्कम इतर मागवलेल्या हमीच्या रकमेच्या तुटवडयाबरोबर जुळवली जाणार

नाही. वरीलप्रमाणे हिशेब केलेल्या प्रावधानापेक्षा जास्ती रक्कम जर असेल तर ती जादा रक्कम फिरवण्यात येणार नाही. प्रत्येक वर्षी केलेले प्रावधान नफा तोटा पत्रकात वेगळी दाखवण्यात येईल. ज्या हमी बोलावल्यावर त्यांची पूर्तता करताना वेगळा दाखवण्यात येईल. ज्या हमी बोलावल्यावर त्यांची पूर्तता करताना तोटा होईल अशा तोटयासाठी केलेले प्रावधान ताळेबंदाच्या देयता बाजूला वेगळा दाखवण्यात येईल.

**"झालेले, पण अहवाल न देलेले तोटे" या बाबतचे प्रावधान (आय.बी.एन.आर)**

२१. एखाद्या गृहकर्ज हमी कंपनीला तिने हमी दिलेल्या कर्जाची परतफेड न झाल्यास तोटा होण्याची शक्यता असते. अशा तऱ्हेच्या घटना होण्या आधी किंवा परतफेड न होण्याच्या आधी अशा तोटयासाठी तसेच हमी परत मागण्या आधी या कंपन्या प्रावधान करुन ठेवतात. अशा तोटयांना "झालेले पण अहवाल न दिलेले तोटे (आय.बी.एन.आर.) अशा तऱ्हेच्या प्रावधानाची रक्कम अक्च्युरियल बेसिस वर असेल व ती किती वेळा व किती गंभीर तोटा होत आहे या वर अवलंबून असेल. ही रक्कम, दिलेले दावे, दिलेल्या दाव्यांसाठी केलेली प्रावधाने, जोखमीची आकडेवारी या बाबातच्या आकडेवारीवर अवलंबून असेल. अशा तऱ्हेने हिशेब केलेल्या रकमेपेक्षा जास्ती केलेले प्रावधान फिरवण्यात येणार नाही. प्रत्येक वर्षासाठी केलेले प्रावधान नफातोटा पत्रकात दरवर्षी वेगळे दाखवण्यात येईल. हे प्रावधान देयता विभागात दाखवला जाईल.

**हमी पत्राचे रजिस्टर ठेवणे.**

२२. प्रत्येक तारण हमी एक किंवा जास्त रजिस्टर ठेवेल व त्यात खालील तपशील असेल

(अ) कर्जदार/सहकर्जदार यांचे नाव व पत्ता (ब) मंजूर केलेल्या कर्जाची तारीख व रक्कम

(क) मलमत्तेचे तपशील व पत्ता

(ड) कर्जासाठी ठेवलेले तारण

(ई) कर्जाची मुदत

(एफ) प्रत्येक हप्त्याची रक्कम व देय तारीख

(जी) ज्या गृहवित्त कंपनीला हमी दिली आहे तिचे नाव व पत्ता

(एच) हमीची तारीख व रक्कम

(आय) हमीची मुदत.

**तारण हमी कंपनीचे दायित्व**

२३. जिथे तारण हमी कंपनीने तारण दिले आहे तेथे अशा कंपनीची देयता तारण हमी कर्ज देणारी कंपनी, कर्ज देणारी कंपनी व कर्ज घेणारा यांच्या करारानुसार असेल.

२४. घटना घडवणाऱ्या दिवसानंतर ज्या कर्ज देणाऱ्या संस्थेने तारण हमी कंपनी कडून तारण हमी मिळवली आहे, त्या कंपनी विरुद्ध हमी मागता येईल.

२५. ज्या बँकेच्या किंवा गृहवित्त कंपनीला तारण हमी कंपनीने तारण हमी दिली असेल त्या कंपनीकडून नोटीस आल्यावर कुरकुर न करता तारण हमी ची देयता तारण हमी कंपनीने दिली पाहिजे.

२६. जर कर्ज "कार्य न करणारी मालमत्ता" झाली व कर्ज देणाऱ्या संस्थेने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनन्शियल अँसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट २००२ या कायद्याखाली दिलेल्या त्वरित वसुली पद्धतीचा अवलंब करुन जर काही रक्कम मिळवलीतर तारण हमी कंपनीची देयता तेवढी कमी होते.

२७. कोणतीही तारण हमी कंपनी गृह कंपनी गृहकर्जाच्या .९०% पेक्षा जास्त तसेच ए.टी.व्ही. गुणोत्तरापेक्षा जास्त तारण हमी देणार नाही

**तारण हमी कंपनीने घेण्याची दक्षता.**

२८. गृह कर्जाच्या परताव्या साठी हमी देण्यापूर्वी तारण हमी कंपनीने इतर गोष्टीं प्रमाणे खालील गोष्टींची खात्री करुन घ्यावी.

(अ) कर्ज योग्य तारणाने सुरक्षित केले आहे

(ब) कर्ज देणाऱ्या कंपनीने मालमत्तेचा मालकी हक्क, बाजारात माल खपण्याची शक्यता व कर्जदाराची पत याची खात्री करुन घेतली आहे

(क) कर्जदार कंपनीने ज्या जमीनीवर घर बांधलेले आहे किंवा बांधले जाणार आहे त्या जमीनीच्या वापराची खात्री करुन घेतली आहे.

(ड) कर्जदाराने घर बांधण्यासाठी योग्य अधिकाऱ्यांकडून आवश्यक त्या परवानग्या मिळवल्या आहेत याची खात्री कर्ज देणाऱ्या कंपनीने केले आहे का याची खात्री तारण हमी कंपनीने करुन घ्यावी व अशा परवानगीची प्रत घ्यावी.

(ई) कर्ज हमी कंपनीने मालमत्तेच्या किमतीच्या. ९०% पेक्षा जास्त हमी दिली नाही ना याची खात्री करुन घ्यावी.

**प्रतिबंध**

२९ (१). जे कर्ज घराच्या/रहात्या मालमत्तेच्या तारणाने सुरक्षित नाही त्या कर्जाची हमी कंपनी देणार नाही.

**कमीशन, सवलती किंवा प्रोत्साहन न देणे**

२९(२). तारण हमी कंपनी व्यवसाय देणाऱ्या व्यक्तीला कमीशन, सवलती किंवा इतर प्रोत्साहन देणार नाही.

**संबंधित व्यक्तींचे तारण दायीत्वाची हमी देण्यावर प्रतिबंध.**

२९(३). तारण हमी कंपनी जेथे अशांचे भागधारकत्व ५% किंवा जास्त असेल, आपले प्रवर्तक/उपकंपन्या, संबधित व्यक्ती/संस्था यांनी दिलेल्या तारणाची हमी देणार नाही.

**गुंतवणूका.**

२९ (४). तारण हमी कंपनी जमीनीच्या मालमत्तेने सुरक्षित अशा कर्ज पुराव्यामध्ये किंवा नोटस मध्ये गुंतवणूक करणार नाही. मात्र जमीनीने सुरक्षित केलेले दायित्व व जमीनीच्या मालमत्तेचे विक्री व्यवहार यांना की जिथे असे व्यवहार किंवा दायित्व कंपनीने दिलेल्या पॉलिसीच्या दाव्याच्या पोटी केलेले आहे अशांना हा नियम लागू होत नाही.

**लेखा परिक्षा समितीचे गठन.**

३०. तारण हमी कंपनी लेखा परीक्षा समितीचे गठन करील. या समितीमध्ये निदेशक मंडळाचे तीन पेक्षा कमी नाही इतके अकार्यकारी निदेशक सदस्य असतील त्यापैकी किमान एक चार्टर्ड अकाउटंट असेल.

**हमी देण्याचे धोरण.**

३१. कर्ज देणाऱ्या कंपन्यांना हमी देण्यासाठी तारण हमी कंपन्यांचे निदेशक मंडळ एक धोरण ठरवतील अशा धोरणामध्ये

(अ) हमी देण्यासाठी फी किंवा प्रिमीयम आकारण्याची पद्धती, त्यात कर्जाची रक्कम, एल.टी.व्ही. गुणोत्तर, कर्ज घेणाऱ्यांची पत प्रतिष्ठा व पतमापन बँक/गृह वित्त कंपनीचे व्यवस्थापन कौशल्य

(ब) तारण हमी देण्यासाठी वा हमी करारात भाग घेण्यासाठी अधिकार प्रदान

(क) गृहवित्त कंपन्या

(ड) कर्ज घेणाऱ्यांकडून कर्ज वसूलीसाठी कारवाई करण्यासाठी अधिकार प्रदान.

**तारण हमी योजनाः**

३२. तारण हमी देण्यासाठी तारण हमी कंपनी एक सविस्तर योजना तयार करील व त्याला निदेशक मंडळाची मान्यता घेईल. त्यामध्ये खालील गोष्टी असतील.

(अ) गृहकर्जाची गुणवत्ता

(ब) तारण हमी कराराखाली समाविष्ट असलेला बँक वा गृहवित्त कंपनीने दिलेल्या कर्जाचा जास्तीत जास्त भाग

(क) हमी करारामध्ये समाविष्ट करण्याचा किमान व कमाल एल.टी.व्ही. गुणोत्तर

(ड) हमी देण्याच्या बदल्यात आकारण्यात येणारे शुल्क किंवा प्रिमीयम व तो देण्याची पद्धती

(ई) जेंव्हा तारण हमी कंपनीची देयता कर्जदारा बरोबरच असेल तेंव्हा कंपनीची देयता किती असेल

(एफ) तारण हमी कंपनी किंवा बँक या पैकी तारण हमी परत मागवल्यावर वसूली कोणी करायची व पैसे कोणी द्यायचे.

**प्रति हमी**

३३. जेंव्हा तारण हमी कंपनी आपण हमी दिलेल्या कर्जाबाबत दुसऱ्या तारण हमी कंपनीकडून प्रति हमी मिळवते, तेंव्हा दोन्ही कंपन्यांना आपण घेतलेल्या जोखमीच्या प्रमाणात राखीव निधी ठेवावा लागेल. तो अशा रीतीने ठेवावा लागेल की तारण हमी कंपनी संबंधीच्या भारतीय कायद्यांच्या तरतुदीपेक्षा कमी नसेल. जर प्रति हमी कंपनी भारतीय नियामकांच्या नियंत्रणाखाली नसेल तर दाव्याची हमी देणारी कंपनी निधी व प्रावधाना संबंधीच्या तरतुदीचे पालन करील.

**सवलत (एक्झम्पशन)**

३४. योग्य कारणासाठी वा अडचणी येऊ नयेत म्हणून एखाद्या तारण हमी कंपनीला किंवा कंपन्यांच्या वर्गाला रिझर्व बँक या सर्व मार्गदर्शक तत्वांमधून किंवा काही मार्गदर्शक तत्वांमधून रिझर्व बँक सवलत देईल. ही सवलत काही विशिष्ट काळासाठी असेल या साठी रिझर्व बँक काही अटी लावील.

३५. या मार्गदर्शक तत्वांबाबत रिझर्व बँक काही स्पष्टीकरण देईल व ते स्पष्टीकरण या मार्गदर्शक तत्वांचा एक भाग समजला जाईल. या मार्गदर्शक तत्वात वेळेवेळी सुधारणा केल्या जाऊ शकतात.

(पी.कृष्णमूर्ती)

प्रभारी मुख्य महाप्रबंधक

**भारतीय रिझर्व बँक**
**अबँकीय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर कफ परेड**
**कुलाबा - मुंबई ४००००५**

**सूचना**पत्र **डी.एन.बी.एस.(पी.डी.)एम.जी.सी. क्रमांक ४/सीजीएम (पी.के.) २००८ दिनांक** फे**ब्रुवारी १५, २००८.**

रिझर्व बँकेने सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून व देशहितासाठी बँक यंत्रणा नियंत्रित करणे आवश्यक आहे असे वाटल्यास रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ जे.ए. मध्ये दिलेल्या अधिकारांनुसार तारतम्य दंडकाबाबत (प्रूडेंशियल नॉर्म) प्रत्येक तारण हमी कंपनीला खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे घालून देत आहे.

**संक्षिप्त विवरण, सुरवात व आदेश लागू होणे.**

१ (अ) या आदेशांना तारण हमी कंपन्या "तारतम्य दंडक (रिझर्व बँक) आदेश २००८" असे म्हटले जाईल.

(ब) हे आदेश तत्काल लागू होतील व ज्या तारण हमी कंपन्यांना तारण हमी कंपन्या नोंदणी योजनेखाली नोंदणी पत्रक दिले आहे त्या कंपन्यांना हे आदेश लागू होतील.

**व्याख्या**

२ (१) संदर्भासाठी अन्य काही आवश्यकता नसल्यास - "संशयास्पद मालमत्ता" म्हणजे

(२) "संयुक्त कर्ज भांडवल साधन" म्हणजे - अशी भांडवल साधन की ज्यात कर्ज व समभाग या दोघांचीही वैशिष्ट्ये असतील.

(३) "तोटा मालमत्ता" म्हणजे -

(अ) तारण हमी कंपन्यानी किंवा त्यांच्या अंतर्गत किंवा बाह्य लेखा परिक्षकांनी जी मालमत्ता तोटा मालमत्ता म्हणून ठरवली आहे. मात्र ती जो पर्यंत लेखापुस्तकातून रद्द केली नसेल (राईट ऑफ) त्या प्रमाणातच असेल व

(ब) खालील कारणामुळे जी मालमत्ता वसूल न होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. तारणाची किंमत कमी होणे किंवा कर्ज घेणाऱ्याच्या लबाडीमुळे किवा काही काम न केल्यामुळे तारणाची मालमत्ता उपलब्ध न होणे इत्यादी

(४) "तारण हमी कंपनी" म्हणजे तारण हमी कंपनी (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २००८ च्या परिच्छेद २(१) (१) मधील व्याख्येनुसार.

(५) (१) या मार्गदर्शक तत्वांसाठी "मालकीचे निव्वळ धन" म्हणजे

(अ) भरणा झालेले भाग भांडवल व ताळेबंदात दाखवलेले मुक्त निधी वजा -

(i) संचित तोटा

(ii) पुढे ढकललेले महसूली खर्च

(iii) इतर न ओळखण्यासारखी मालमत्ता व

(ब) आणखी खालील रकम वजा करणे.

(१) अशा कंपन्यांचे

(i) उपकंपन्याच्या समभागातील गुंतवणूक

(ii) त्याच गटातील कंपन्यातील गुंतवणूक

(iii) इतर गैर बँकिंग कंपन्या मधील गुंतवणूक

(२) कर्जरोखे, बाँड, उर्वरीत कर्जे व अग्रीम (भाडे खरेदी अधिक लीज वित्त) खालील व्यक्ती/संस्थांना दिलेले

(i) अशा कंपन्यांच्या उपकंपन्या व

(ii) त्याच गटातील कंपन्या १०% पेक्षा जास्त रक्कम

(II) उपकंपन्या व त्याच गटातील कंपन्याचा अर्थ कंपनी कायदा १९५६ (१९५६ चा १) या मध्ये दिलेल्यानुसार असेल

(vi) तारण हमी मालमत्तेसंबंधी कार्य न करणारी मालमत्ता म्हणजे कार्य करणारी घटना झाल्यानंतर पत संस्थेकडून मिळवलेली मालमत्ता की जिची थेट "कार्य न करणारी मालमत्ता" अशी वर्गवारी करण्यात येईल व त्या नंतर तिच्या वयानुसार (कालावधीनुसार) वर्गवारी करण्यात येईल

(vii) मालकीचे धन म्हणजे भरणा झालेले भाग भांडवल तारण हमी कंपन्यांची नोदणी व कार्य या बाबतच्या मार्गदर्शक तत्वांच्या कलम १८ नुसार ठेवलेला आवश्यकता (कॉंटिंन्जन्सी) निधी भाग भांडवल अधिमूल्य खात्यातील रक्कम व मालमत्ता विकल्या नंतर निर्माण होणारे भांडवली निधी (मात्र यातून मालमत्तेचे पुर्नमुल्यांकन करुन आलेला निधी वगळला जाईल).

(vii) मानक मालमत्ता - ज्या मालमत्तेबाबत मुद्दल किंवा व्याजाच्या परताव्याबाबत कोणताही हलगर्जीपणा होईल असे वाटत नाही व ज्यात व्यवसायातील सामान्य धोके वगळल्यास अधिक धोके व समस्या उदभवत नाहीत.

(ix) “तारण हमी मालमत्तेबाबत कमी दर्जाची मालमत्ता” म्हणजे जी मालमत्ता १२ महिन्यांपेक्षा जास्त नाही अशा कालावधीसाठी “काम न करणारी मालमत्ता” म्हणून वर्गीकृत केली आहे.

(x) उपकर्ज म्हणजे - असे वित्त साधन की ज्याचा पूर्ण भरणा झाला आहे, जे असुरक्षित आहे व इतर धनकोंच्या दाव्यापेक्षा कमी दर्जाचे आहे व त्यात बंधक नियम नहीत व धारकाच्या इच्छेनुसार त्याचा परतावा होत नाही किंवा तारण हमी कंपनीच्या नियामक अधिकाऱ्यांच्या परवानगी विना त्याचा परतावा होत नाही. अशा वित्त साधनाची हिशेब पुस्तकातील किंमतीमध्ये खाली प्रमाणे घट करण्यात येईल.

| वित्त साधनाची कालमर्यादा पूर्ण होण्याचा दिवस व | घट करण्याची टक्केवारी - |
|---|---|
| (अ) एक वर्षापर्यंत | १००% |
| (ब) एक वर्षापेक्षा जास्त पण दोन वर्षापर्यंत | ८०% |
| (क) दोन वर्षापेक्षा जास्त पण तीन वर्षापर्यंत | ६०% |
| (ड) तीन वर्षापेक्षा जास्त चार वर्षापर्यंत | ४०% |
| (ई) चार वर्षापेक्षा जास्त पण पाच वर्षापर्यंत | २०%. |

अशा तऱ्हेची केलेली घट स्तर एक भांडवलाच्या ५०% पेक्षा जास्त असणार नाही.

(xi) “भरघोस स्वारस्य” म्हणजेच एखाद्या कंपनीच्या समभागामध्ये एखाद्या व्यक्तीचे त्याच्या पती/पत्नीचे वा अवयस्क मुला/मुलींचे एकटे वा एकत्र फायदेशीर स्वारस्य की जे कंपनीच्या पैसे भरलेल्या भाग भांडवलाच्या १०% पेक्षा जास्त असेल किंवा एखाद्या भागीदारी फर्ममध्ये सर्व भागीदारांनी भरलेल्या भांडवलाचा १०%पेक्षा जास्त.

(xii) स्तर १ भांडवल म्हणजे स्वतःचे धन उणे उपकंपन्यातील व त्याच गटातील इतर कंपन्यातील की ज्या एकूण स्वतःच्या धनाच्या १०% असतील. गैरबँकिंग कंपन्यातील समभागातील, कर्जरोख्यातील, बाँडमधील गुंतवणूक, न अदा झालेली कर्जे व अग्रीम (भाडे-खरेदी व लीज वित्त सहाय्यासह) व ठेवी.

सूचना :- सहकंपन्या व त्याच गटातील कंपन्यातील समभागातील गुंतवणूक ही तारण हमी कर्जाच्या परताव्यातून केलेली गुंतवणूक.

(xiii) “स्तर २ भांडवल” यामध्ये या गोष्टींचा समावेश होतो. -

(अ) प्रेफरन्स समभाग

(ब) पुनर्मुल्यांकन निधी - ५५% दराने कमी केलेला

(क) एखाद्या विशिष्ट मालमत्तेच्या किंमतीत घसरण किंवा एखाद्या मालमत्तेत ओळखली जाईल असा तोटा, याच्याशी संबंधित नसलेले सर्वसामान्य प्रावधाने व तोटा निधी की जे मानक मालमत्तेवरील अनपेक्षीत तोटा व प्रावधानांच्या जोखमीच्या हिशेब केलेल्या मालमत्तेच्या एक व एक चतुर्थांश टक्क्यापर्यंत उपलब्ध असतील.

(ड) ज्याची एकूण संख्या स्तर १ भांडवला पेक्षा जात नाही अशी संयुक्त कर्ज व भांडवल वित्त साधने व

(ई) कमी दर्जाची कर्जे.

(xiv) उलाढाल किंवा व्यवसाय उलाढाल म्हणजे एखाद्या वर्षात केलेले एकूण तारण हमी कर्जे अधिक इतर व्यवसायातून आलेली उलाढाल.

(२) इतर वापरलेले शब्द की ज्यांची व्याख्या येथे दिली नाही पण रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४(१९३४ चा २) किंवा तारण हमी कंपनी (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २००८ की जी डी.एन.एस.बी.(पी.डी.) एम.जी.सी.णो. ३/ सी.जी.एन.(पी.के.)- २००८ दि. १५ फेब्रुवारी २००८ मध्ये नमूद केली आहेत त्यामधील अर्थ येथे लागू होईल. इतर शब्द ज्यांचा या कायद्यात वा मार्गदर्शक तत्वे या आदेशामधील व्याख्या दिल्या नाहीत त्या ठिकाणी कंपनी कायदा १९५६ (१९५६ चा १) यातील व्याख्या वा अर्थ येथे लागू होतील.

**आय ओळखणे**

३ (i) कार्य न करणाऱ्या मालमत्ते वरील भार किंवा कर्ज देणाऱ्या संस्थेकडून घेतलेले कार्य न करणारी मालमत्ता किंवा या वरील आय कार्य घडवणाऱ्या घटना झाल्यावर आलेली आय यासकट सर्व आय सर्व आय रोख पद्धतीवर ओळखली जाईल.

(ii) तारण हमी कंपनी आपले शुल्क किंवा प्रिमीयम, चार्टर्ड अकाउटंटस ऑफ इंडियाने जारी केलेल्या लेखा मानकानुसार आय म्हणून ओळखेल व न मिळवलेला प्रिमीयम ताळेबंदात वेगळा दाखवला जाईल

(iii) रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ (१९३४ चा २) च्या कलम ४५ आय(सी) मध्ये दिल्याप्रमाणे परवानगी दिलेल्या मर्यादेत तारण हमी कंपनीने केलेल्या इतर व्यवसायाच्या बाबतीत गैरबंकिंग वित्तीय कंपनी (ठेवी न स्वीकारणारी व न राखणारी) कंपनीच्या तारतम्य दंडक (रिझर्व बँक) आदेश २००७ प्रमाणे आय ओळखेल.

**लेखा मानक -**

**४** .जो पर्यंत या आदेशाशी विसंगत नाही तो पर्यंत या कपन्या इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकाउटंटस ऑफ इंडियाने जारी केलेल्या लेखा मानक व मार्गदर्शक तत्वांचे पालन करील.

**मालमत्ता वर्गवारी -**

५. प्रत्येक तारण हमी कंपनी पत कमजोरी व मालमत्तेची वसूली करण्यासाठी सहसुरक्षेवर अवलंबून रहाणे लक्षात घेऊन आपल्या मालमत्तेची, कर्जाची व अग्रीमाची व इतर पत यांची वर्गवारी खालील वर्गात करील

(१) मानक मालमता*; (हमी देयका खाली मिळालेली मालमत्ता मानक मालमत्ता गणली जाणार नाही)

(२) मानक मालमत्ते-पेक्षा कमी दर्जाची मालमत्ता;

(३) संशयास्पद मालमत्ता;

(४) तोटा मालमत्ता.

(२) रिझर्व बँकेने घालून दिलेल्या अटीचे पालन केल्याखेरीज वरील मालमत्तेचे वर्गीकरणाची फेररचना करुन त्यांचे उर्ध्व मूल्यांकन करता येणार नाही.

**प्रावधान आवश्यकता** -

६.(१) **परत मागवलेल्या हमी वरील तोटयाचे प्रावधान** - हमी परत मागवल्यास तारण हमी कंपनीला तोटा होऊ शकतो. अशा तोटयासाठी मालमत्तेची वसूली होईपर्यंत या कंपन्यांना तोटयासाठी प्रावधान करावे लागते. ह्या प्रावधानाची रक्कम ही परत मागवलेल्या हमीची रक्कमेच्या करारांची बेरीज उणे ज्या मालमत्तेबाबत हमी परत मागवली आहे त्याची वसूल होईल ती किंमत अशी असेल जर मालमत्तेची वसूल होणारी रक्कम जास्त असेल तर हा फरक इतर मागवलेल्या रकमांच्या तोटया बरोबर जुळवता येणार नाही. जर आधी केलेली प्रावधानवरील रकमेच्या फक्षा जास्त असेल तर फरक उलट करता येणार नाही. प्रत्येक वर्षी केलेले प्रावधान नफा तोटा खर्चामध्ये वेगळे दाखवावे लागेल. मागवलेल्या हमीवर पैसे परते आल्यावर झालेल्या तोटयाची रक्कम ताळेबंदात देयक बाजूला वेगळी दाखवावी लागेल

(२) **झालेला पण अहवाल न केलेला (आयबीएनआर) तोटा :** या रकमेचे प्रावधान जेंव्हा एखाद्या हमी दिलेल्या गृहकर्जाच्या परत फेडीमध्ये हलगर्जी होते तेंव्हा तारण हमी कंपनीला तोटा होण्याची शक्यता असते. जो पर्यंत हमी परत मागवली गेलेली नाही किंवा कार्य घडवणारी घटना होत नाही तो पर्यंत तोटा होण्याची शक्यताच असते व त्याला 'झालेला पण अहवाल न केलेला (आयबीएनआर) तोटा' म्हणतात. या तोटयासाठी करण्याचे प्रावधान मूल्यांकन (अँक्च्युरियल) पद्धतीने केलेली असते व ती किती वेळा तोटा झाला व किती मोठया प्रमाणात झाला या बाबतची ऐतिहासिक माहिती, आर्थिक घटक, दिलेल्या दाव्याबाबतची आकडेवारी, माहिती, जोखमी बाबतची माहिती यावर आधारित असते. जर आधी केलेले प्रावधानवरील रकमे पेक्षा जास्त असले तर जास्त रक्कम उलट फिरवती येणार नाही. प्रत्येक वर्षी केलेले प्रावधान जमा खर्च खात्यात वेगळी दाखवावी लागेल. झालेल्या परंतु अहवाल न केलेल्या तोटयाची प्रावधान रक्कम ताळेबंदाच्या देयक बाजूला दाखवावी लागते.

(३) वरील गोष्टी लक्षात घेऊन तसेच एकादी मालमत्ता काम न करणारी होण्यासाठी वेळ जाणे, ते समजण्यामध्ये जाणारा वेळ, तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेची किंमत कमी होणे वा ती मिळणे, यात जाणारा वेळ या सर्वांचा विचार करुन खालील गोष्टींसाठी प्रावधान करावे लागेल.

**(४) तारण हमी मालमत्ता**

या बाबतच्या प्रावधानाची आवश्यकता खालीलप्रमाणेः

(i) तोटा मालमत्ता - सर्व मालमत्ता लेखा पुस्तकातून रद्द केली जाईल. जर काही कारणासाठी मालमत्ता लेखा पुस्तकात ठेवायची असेल तर येणाऱ्या रमकेसाठी १००% प्रावधान केले पाहिजे

(ii) संशयातीत

(अ) ज्या ठिकाणी तारणाच्या रकमेने मालमत्तेसाठी तरतूद केली नाही या बाबतीत दिलेल्या अग्रीमा साठी १००% प्रावधान तारणाची येऊ शकणारी मालमत्तेचे मोजमाप सत्य परिस्थितीवर करावे

(ब) जो भाग तारणाने सुरक्षित आहे त्या बाबतीत खालील पद्धतीने तारणाने सुरक्षित भागाच्या २०% ते १००% प्रमाणात करावे.

| **ज्या काळासाठी मालमत्ता संशयास्पद रहाते** | प्रावधाना ची टक्केवारी |
|---|---|
| एक वर्षापर्यंत | २०%, |
| एक ते तीन वर्षे | ३०%, |
| तीन वर्पापेक्षा जास्त | १००% |

(iii) कमी दर्जाची मालमत्ता एकूण येणाऱ्या रकमेच्या १०% प्रावधान करावे.

**मानक मालमत्तेसाठी**

मानक मालमत्ता तारण हमी कंपन्यांनी मानक मालमत्तेसाठी खालील प्रमाणे सामान्य प्रावधान करावा.

(अ) रहात्या घरासाठी २० लाखांपेक्षा जास्त रकमेवर १% हमी प्रावधान

(ब) इतर हमी साठी ०.४० %

**सूचना:**

(१) मानक मालमत्तेचे प्रावधान निव्वळ काम न करणारी मालमत्ता काढण्यासाठी लक्षात घेऊ नये.

(२) मानक मालमत्तेसाठीचे प्रावधानाची निव्वळ रक्कम घेण्याची आवश्यकता नाही पण इतर देयक रकमा व प्रावधाने या कलमाखाली मानक मालमत्तेसाही आवश्यक असल्यास प्रावधान असे ताळेबंदात दाखवावे.

(३) हे स्पष्ट करण्यात येते की आय ओळखणे व काम न करणाऱ्या मालमत्तेसाठी प्रावधानया तारतम्य दंडकाचे दोन वेगळे दृष्टीकोन आहेत आणि काम न करणाऱ्या मालमत्तेवरील प्रावधान हे एकूण येणाऱ्या

रकमेवर करायचे असते. एकादी काम न करणारी मालमत्ता ओळखली नाही हे प्रावधान करण्यासाठी कारण होऊ शकत नाही.

**इतर कार्य —**

(७) तारण हमी कंपनी तिच्या एकूण मालमत्तेच्या १०% पर्यंत कोणतेही कार्य हाती घेऊ शकते. जर अशा कंपन्या रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा १०% च्या कलम ४५ आय (सी) नुसार ठरवलेल्या मर्यादेत व्यवसाय करतील तर त्या साठी तारतम्य दंडक ठरवले आहेत व ते डी.एन.बी.एस. १९३ डी.जी.(व्ही.एल)- २००७ दिनांक २२ फेब्रुवारी २००७ (वेळोवेळी दुरुस्त्या केलेल्यानुसार) या आदेशामध्ये दिलेले आहे. या मध्ये गुंतवणूकीची किंमत काढणे, मालमत्ता वर्गीकरण व प्रावधान करणे या बाबतचे आदेश पाळावेत.

**लेखा वर्ष**

८. प्रत्येक तारण हमी कंपनीने आपले ताळेबंद व नफा तोटा पत्रक प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला तयार करावे. जर एकादी तारण हमी कंपनी, कंपनी कायद्यानुसार आपले लेखा वर्ष बदलू इच्छित असेल तर तिने कंपनी निबंधकापुढे जाण्या आधी रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घ्यावी.

जरी या दोघांनीही लेखा वर्प वाढवण्यला अनुमती दिली तरीही कंपनीने बँकेला ३१ मार्चला संपलेल्या वर्षाचे प्रोफॉर्मा ताळेबंद व कायदेशीर रिटर्न्स (लेखा परीक्षा न केलेले) पाठवावेत.

**ताळेबंदात प्रदर्शित करण्याच्या गोष्टी :**

९.(१) प्रत्येक तारण हमी कंपनीने परिच्छेद ६ मध्ये दिल्याप्रमाणे प्रावधाने वेगवेगळी प्रदर्शीत करावीत. आय किंवा मालमत्तेच्या किमतीवर निव्वळ किंमत दाखवू नये.

(२) तारण हमी व्यवसाय कंपन्यांनी व तारण हमी व्यवसाय व इतर व्यवसाय यासाठीची प्रावधाने वेगळी दाखवावीत. तसेच प्रत्येक तऱ्हेच्या मालमत्तेसाठी खालील प्रमाणे वेगवेगळी प्रावधाने दाखवावीत (i) संशयास्पद कर्जासाठी प्रावधान

(ii) गुंतवणूकीतील किमतीच्या घसाऱ्यासाठीचे प्रावधान

(३) अशी प्रावधाने प्रत्येक वर्षासाठी वेगवेगळी करुन नफा तोटा पत्रकात दाखवावीत.

**तारण हमी कंपनीने लेखा परीक्षा समीतीचे गठन करणे.**

१०. प्रत्येक तारण हमी कंपनीने लेखा परीक्षा समीतीचे गठन करावे. ह्या मध्ये कंपनीचे कमीत कमी तीन अकार्यकारी निदेशक असले पाहिजे त्यापैकी किमान एक चार्टर्ड अकाऊटंट असला पाहिजे. खुलासा १ : कंपनी कायदा १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २९२ अ खाली गठन केलेली समिती या परिच्छेदासाठी लेखा परीक्षा समिती समजली जाईल. व त्या समीतीची कार्य, तिचे अधिकार व कर्तव्ये कंपनी कायदा कलम २९२ अनुसार असतील.

खुलासा २ः ह्या परिच्छेदाखाली स्थापन झालेल्या ऑडिट समितीला, कंपनीज् अधिनियम १९५३ (१९५३ चा १) कलम २९२ अ मध्ये दिलेलेच अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये असतील.

**शासकीय प्रतिभूती मधील व्यवहार**

११. प्रत्येक तारण हमी कंपनी सी.एस.जी.एल. खाते व डीमॅट खात्यातून शासकीय प्रतिभूतीमध्ये व्यवहार करु शकते. मात्र कोणतीही कंपनी दलालामार्फत कागदी (फिजिकल) शेअर्स मध्ये सरकारी प्रतिभूतीमध्ये व्यवहार करु शकत नाही.

**भांडवल पुरेसे असण्याची आवश्यकता**

१२.(१) प्रत्येक तारण हमी कंपनीकडे निखळ मालकीचे धन किमान १०० कोटी रुपये किंवा रिझर्व बँक प्रस्तावित करेल तेवढी असली पाहिजे. त्याच प्रमाणे स्तर १ व स्तर १० भांडवल हे ताळेबंदाच्या एकूण वेटेड मालमत्ता व ताळेबंदाच्या बाहेरच्या जोखीम जुळवणी बाबींच्या १०% पेक्षा कमी असता नये. कंपनी एकूण जोखीम वेटेड मालमत्तेच्या किमान ही रक्कम स्तर १ भांडवल म्हणून ठेवले पाहिजे. (२) स्तर २ भांडवल हे स्तर एकच्या १००% पेक्षा जास्त असता कामा नये.

**खुलासा :**

**ताळेबंदातील मालमत्ता.**

१) ज्या आदेशामध्ये ताळेबंदातील मालमत्तेला पत जोखीम टक्केवारीत वेट म्हणून लावली गेली आहे. म्हणून प्रत्येक मालमत्तेच्या/बाबीची किंमत त्या त्या जोखीम वेट ने गुणली पाहीजे की ज्या वरुन मालमत्तेची जोखीम बरोबर जुळवलेली किंमत येते. किमान भांडवल गुणोत्तर काढताना याची एकूण लक्षात घेतली जाते. जोखीमे बरोबर जुळणी केलेली मालमत्ता काढताना फंडेड गोष्टींचा वेटेड एकूण लक्षात घेतली जाईल. ते या नुसार असेल.

**मालमत्तेच्या गोष्टी -**

| ताळेबंदातील गोष्टींचे जोखीम | वेटेज |
|---|---|
| (i) रोकड | ० |
| (ii) बँकेतील शिल्लक, बँकेवरील दावे, मुदत ठेवी व ठेवींची प्रमाणपत्रे | २०% |
| (iii) <u>गुंतवणुकी</u> | |
| (अ) केंद्र सरकार व राज्य सरकार | ०% |
| (ब) बँकांचे रोखे | २०% |
| (क) मुदत ठेवी/ठेवीची प्रमाणपत्रे/सार्वजनिक आर्थिक संस्थांचे रोखे | १००% |

(ड) सर्व कंपन्यांचे समभाग व कर्जरोखे/रोखे/व्यापारी कागद/कर्जाच्या सारखे.

मनी मार्केट म्युच्युअल फंड १००%

(तारण हमी कंपन्यांच्या गुंतवणूक (रिझर्व बँक) आदेश २००८ च्या परिच्छेद ३ (ii) नुसार कर्जाच्या मोबदल्यातच फक्त कंपन्यांचे शेअर्स घेता येतात

(iv) <u>चालू मालमत्ता</u>

(अ) कर्ज व अग्रिम १००%

(ब) निवृत्ती वेतमामे घटीच्या व फायद्याच्या तारणाने

सुरक्षित झाले असल्यास कर्मचाऱ्यांना दिलेले कर्ज २०%

(क) कर्मचाऱ्यांना दिलेले इतर कर्ज १००%

(ड) इतर सुरक्षित कर्ज व अग्रीम १००%

(इ) इतर (भाडयाने घेतलेला निव्वळ स्टॉक, )

<u>खरेदी केलेली व डिस्काऊंट केलेली बिले</u> १००%

(v) अचल मालमत्ता (घसारा वजा करुन)

(अ) भाडयाने दिलेली मालमत्ता निव्वळ पुस्तकी किंमत १००%

(ब) प्रिमायसिस १००%

(क) फर्निचर व फिक्स्चर १००%

(ड) इतर अचल मालमत्ता १००%

(vi) <u>इतर मालमत्ता</u>

(अ) उदगामाला केलेली कर कपात (प्रावधान करुन उरलेली) ०%

(ब) अदा केलेला अग्रीम कर (प्रावधान करुन उरलेली रक्कम) ०%

(क) सरकारी प्रतिभूतीवरील व्याज ०%

(ड) इतर १००%

**टीपः**

(१) ज्या वाईट व संशयित मालमत्तेवर प्रावधान केले आहे तसेच घसाऱ्याचे प्रावधान केले आहे अशा मालमत्तेची निव्वळ किंमत काढायची असते.

(२) निव्वळ स्वतःचे धन काढण्यासाठी जी मालमत्ता स्वतःच्या धनातून वजा केली असेल त्याचे वेट ० असेल.

(३) जोखमीचे वेटेज काढण्यासाठी एखाद्या कर्जदाराच्या फंडेड एक्स्पोजरचा हिशेब करताना तारण हमी कंपनी रोख मार्जीन/कॉशन मनी/सिक्युरिटी डिपॉझीट (ज्यावर सेट ऑफ घेता येतो) की जे कर्जदाराच्या एकूण एक्स्पोजरच्या अग्रीमासाठी कोलॅटरल म्हणून घेतली आहेत, ते सेट ऑफ करु शकतात.

**ताळेबंदाच्या बाहेरच्या गोष्टी**

(२) या आदेशामध्ये अशा गोष्टींना धरलेली जोखीम एक्सपोजर हे पत परिवर्तनाची टक्केवारी या स्वरुपात सांगीतली जाते. म्हणून ताळेबंदाच्या बाहेरच्या गोष्टींची पत किंमत काढताना प्रत्येक गोष्टीच्या दर्शनी किंमतीला त्या त्या परिवर्तन घटकाने गुणायचे असते. किमान भांडवल गुणोत्तर काढताना एकूण जोखीम वेटेड किंमत लक्षात घेतली जाते. नॉन फंडेड गोष्टीमध्ये परिवर्तन घटकांनुसार ताळेबंदा बाहेरच्या गोष्टींची जोखीम सम किंमत खालील प्रमाणे काढण्यात येईल.

| **गोष्टींचा प्रकार** | **जोखीम परिवर्तन घटक टक्के**. |
|---|---|
| (i) वित्तीय व अन्य हमी | १००% |
| (ii) आर/ओ भांडवली गुंतवणूक, जसे समभाग/कर्ज रोखे इत्यादी बाबतची लेखा हमी दायित्व | ५०% |
| (iii) अंशतः पैसे भरलेले समभाग कर्ज रोखे | १००% |
| (iv) केलेले पण अमलात आणायचे लीज (भाडे पट्टा) करार | १००% |
| (v) इतर प्रासंगिक देयता | ५०% |

**सूचना -** परिवर्तन घटक लावण्या आधी रोख फरक/ठेवी वजा केल्या जातील.

**तारण हमी कंपनीच्या स्वतःच्या समभागावर कर्ज देण्यास बंदी.**

१३.(१) कोणतीही तारण हमी कंपनी स्वतःच्या समभागावर कर्ज देऊ शकत नाही

(२) असे स्वतःच्या समभागावर दिलेले कर्ज देय असल्यास जे कर्ज समभागाचे नोंदणी पत्रक देण्या आधी वसूल केले पाहिजे. पत/गुंतवणूकीचे संपृक्तीकरण.

१४.(१) कोणतीही तारण हमी कंपनी

(अ) तिच्या स्वतःच्या धनाच्या १५% पेक्षा जास्त रक्कम एका कर्जदाराला देऊ शकत नाही

(ब) २५% पेक्षा जास्त रक्कम एका कर्जदार गटाला देऊ शकत नाही.

(२) प्रत्येक तारण हमी कंपनी एकल कर्जदाराला किंवा कर्जदारांच्या एका गटाला कर्ज देण्याबाबत धोरण ठरवील.

**सूचीः**

(१) सदर मर्यादा ठरवण्यासाठी ताळेबंदा बाहेरच्या एक्स्पोजरचे परिवर्तन वर सांगीतल्याप्रमाणे परिवर्तन घटक लावून पत जोखीममध्ये करण्यात येईल

(२) कर्ज रोख्यातील गुंतवणूक ही या परिच्छेदातील हेतू करता गुंतवणूक न समजता पत समजली जाईल.

(३) ह्या मर्यादा तारण कंपनीने स्वतःच्या गटातील कंपन्या /फर्मना किंवा कर्जदाराच्या कंपनीच्या गटाला दिलेल्या पत एक्स्पोजरला लागू होतील.

**पत्त्यातील बदल, निदेशक, लेखा तपासनीस यातील बदल देणे.**

१५. प्रत्येक तारण हमी कंपनी खालील बदल रिझर्व बँकेला एक महिन्यात कळवेल. (अ) नोंदणीकृत कार्यालयाचा/कार्पोरेट कार्यालयाचा पत्ता, फोन नंबर/फॅक्स नंबर

(ब) कंपनीचे निदेशक यांची नावे, घरचा पत्ता

(क) कंपनीचे महत्वाचे अधिकारी व त्यांचे हुद्दे

(ड) कंपनीच्या लेखा परीक्षकांचे नाव व कार्यालयीन पत्ता

(इ) कंपनी तर्फे स्वाक्षरी करायचे अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांच्या नमुना स्वाक्षऱ्या.

**सूट**

१६. रिझर्व बँकेला जर असे वाटले की कोणत्याही तारण हमी कंपनीला अडचणी येऊ नयेत म्हणून किंवा इतर योग्य कारणासाठी काही तरतुदींपासून सूट देण्याची आवश्यकत आहे तर काही अटी वर बँक अशी सूट देऊ शकेल.

**अर्थ लावणे**

१७. वरील आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी रिझर्व बँक यातील कोणत्याही तरतुदींसाठी आवश्यक असे स्पष्टीकरण देईल. सदर स्पष्टीकरण सर्व पक्षांवर बंधनकारक व अंतीम असेल.

(पी. कृष्णमूर्ती)

प्रभारी मुख्य महाप्रबंधक.

**भारतीय रिझर्व बँक**
**अबँकीय पर्यवेक्षण विभाग**
**केंद्रीय कार्यालय**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर कफ परेड**
**कुलाबा - मुंबई ४००००५**

**सूचना** पत्र **डी.एन.बी.एस.(पी.डी.)एम.जी.सी. क्र. ५/सी.जी.एम.(पी.के.)- २००८ दि. १५ फेब्रुवारी २००८.**

सार्वजनिक हितासाठी आवश्यक आहे असे वाटल्यामुळे व देशहितासाठी पतसंस्थेचे नियंत्रण करणे गरजेचे असल्याने रिझर्व बँकेने रिझर्व बँक कायदा १९३४ (१९३४ चा २) या कायळद्याच्या कलम ४५ जे.ए. खाली प्रत्येक तारण हमी कंपनीला खालील प्रमाणे आदेश देते.

**शीर्षक, सुरुवात व आदेश लागू होणे.**

१. (i) या आदेशांना तारण हमी कंपनी गुंतवणूक (रिझर्व बँक ) आदेश २००८ असे म्हटले जाईल (ii) हे आदेश तत्काळ लागू होतील

(iii) यातील तरतुद ज्या तारण हमी कंपनीला रिझर्व बँकेने नोंदणी पत्र दिले असेल अशा सर्व कंपन्यांना हे आदेश लागू होतील.

व्याख्या.

२.(१) संदर्भासाठी इतर अर्थ आवश्यक नसल्यास

(i) “ब्रेक अप किंमत” म्हणजे भाग भांडवल व राखीव निधी वजा अदृश्य मालमत्ता व पुर्नमुल्य निधी या संख्येला ज्या कंपनीत गुंतवणूक केली जाईल त्या कंपनीचे समभाग

(ii) “कॅरीईग कॉस्ट” म्हणजे मालमत्तेची दुरुस्ती किंमत व त्या वरील साठलेले पण न मिळालेले व्याज

(iii) मिळकत किंमत “अर्निंग व्हॅल्यू” म्हणजे समभागाची पुढील प्रमाणे काढलेली किंमत. आधीच्या ३ वर्षाच्या करानंतरचा सरासरी कायदा उणे प्राथमिकता धनांश (प्रेफरन्स डिव्हीडंड) हा नेहमी न होणाऱ्या गोष्टी साठी जुळवणे आवश्यक आहे व या संख्येला ज्या कंपनीत गुंतवणूक होणार आहे त्या कंपनीचे समभागांच्या संख्येने भागणे व खालील प्रमाणे या आलेल्या सख्येचे कॅपिटलायझेशन करणे.

(अ) प्रामुख्याने उत्पादक कंपनीसाठी ८%

(ब) प्रामुख्याने व्यापारी कंपनीसाठी १०% व

(क) इतर कंपनीसाठी (गैर बँकिग कंपनीस) १२%. जर ज्या कंपनीत गुंतवणूक करायचे ती कंपनी तोटयात असेल तर मिळकत कंपनी शून्य धरली जाईल.

(iv) योग्य किंमत (फेअर व्हॅल्यू) म्हणजे मिळकत किंमत व ब्रेक अप किंमत यांचा मीन (सरासरी) (v) "तारण हमी कंपनी" म्हणजे तारण हमी कंपनी तारतम्य दंडक (रिझर्व बँक) आदेश २००८ या मध्ये तारण हमी कंपनीची जी व्याख्या दिली आहे, तशी कंपनी

(vi) निव्वळ मालमत्ता किंमत म्हणजे त्या त्या योजनेतील म्युच्युअल फंडांनी घोषीत केलेली अद्यतन निव्वळ मालमत्ता किंमत

(vii) तारण हमी कंपन्यांनी गुंतवणुकीवर आय ओळकण्यासाठी कार्य करणारी मालमत्ता म्हणजे ज्या मालमत्तेच्या बाबतीत व्याज, मुद्दल किंवा एमोर्टायझेशन ची आवश्यकता. ९० दिवसां पेक्षा जास्त दिवस दिले गेले नाही.

(२) इतर वापरलेले शब्दांच्या (येथे व्याख्या दिल्या नाहीत) पण रिझर्व बँक ऑफ इंडिया कायदा (१९३४ चा २) किंवा तारण हमी कंपन्या तारतम्य दंडक (रिझर्व बँक) मार्गदर्शक तत्वे २००८ मार्गदर्शक तत्वे (एम.जी.सी.) क्र. डी.एन.बी.एस.(पी.डी.) एम.जी.सी ४/सी.जी.एम.(पी.के.)-२००८ दिनांक १५.२.२००८ यामधील अर्थ येथे लागू होतात. ज्या इतर शब्दांचे तेथे अर्थ दिले नाहीत त्यांचे अर्थ कंपनी कायद्यात दिल्याप्रमाणे असतील.

**तारण हमी कंपन्यांची गुंतवणूक धोरणे.**

३ .(i) तारण हमी कंपन्या केवळ खालील गोष्टीत गुंतवणूक करु शकते. (अ) सरकारी प्रतिभूती (ब) सरकारने हमी दिलेल्या कंपन्या/सार्वजनिक उपक्रम यांच्या प्रतिभूतीमध्ये

(क) सूचीकृत व्यापारी बँका/सार्वजनिक वित्तीय कंपना यांच्या मुदत ठेवी, ठेवी प्रमाणपत्रे/रोखे

(ड) कंपन्यांचे सूचीकृत व मानांकनकृत रोखे/कर्ज रोखे

(इ) म्युच्युअल फंडांचे कर्जाकडे पूर्ण रोख असलेले युनिटस

(एफ) सूचीकृत नसलेल्या सरकारी प्रतिभूती व रोखे.

(ii) उपकंपन्या व सहकंपन्यां सकट इतर गुंतवणूकांना परवानगी नाही. परंतु जर तारण हमी कंपनीने तिच्या कर्जापोटी एकाद्या कंपनीचे समभाग (सूचीत असलेले किंवा नसलेले) घेतले असतील तर ते ३ वर्षात किंवा रिझर्व बँकेने वाढवलेल्या काल खंडात) विकले पाहिजेत.

**गुंतवणुकीची पद्धत**

४.(i) तारण हमी कंपनी एकूण गुंतवणूकीच्या २५% गुंतवणूक राज्य सरकारच्या प्रतिभूतीमध्ये गुंतवेल.

(ii) उरलेली गुंतवणूक निदेशक मंडळ आपल्याला योग्य वाटेल तसे करु शकेल. मात्र कंपन्यांच्या सूचीत असलेल्या व मानांकन केलेल्या रोख्यात वा कर्ज रोख्यात किंवा कर्जाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडामध्ये २५% पेक्षा जास्त गुंतवणूक असू नये.

(iii) यातील प्रत्येक गुंतवणूकीसाठी निदेशक मंडळ परिच्छेद ३

(i) मध्ये दिल्याप्रमाणे मर्यादा घालून देउ शकेल.

(iv) एम.सी.जी. ने म्युच्युअल फंडाच्या कर्जाकडे कल असलेल्या म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करण्यासाठी सेबीमध्ये नोंदणीकृत मानांकन कंपन्यांनी दिलेले किमान गुंतवणूक दर मानाकंन (एम.आय.जी.आर) ही आवश्यकता असेल.

आय ओळखणे.

५.(i) ज्या कंपन्या/सरकारी उपक्रमांच्या प्रतिभूतीच्या बाबतीत मुद्दल व व्याजाचा परतावा राज्य वा केंद्र सरकारने हमी दिली आहे व व्याज वेळच्या वेळी येत आहे अशा कंपन्या/सरकारी उपक्रमांच्या प्रतिभूतींबाबत “येणे” या पायावर आय ओळखता येईल.

(ii) ज्या कंपन्यांनी त्यांच्या वार्षीक सर्वसाधारण सभेमध्ये लाभांश जाहीर केला आहे व मालकाचा लाभांश मिळवण्याचा हक्क स्थापित झाला आहे अशा कंपन्यांचा लाभांश तारण हमी कंपन्या आय म्हणून ओळखू शकतात.

(iii) ज्या सरकारी प्रतिभूती तसेच कंपन्यांच्या रोख्यावर व्याज दर ठरलेलेच असतात अशा बाबतीत व्याज वेळेवर येत असेल व थकित येणे नसेल तर तारण हमी कंपन्या असे व्याज येणे तत्वावर आय म्हणून ओळखू शकतात.

(iv) तारण हमी कंपन्यांनी म्युच्युअल फंडापासून येणारी आय रोकड तत्वावर ओळखावी.

**गुंतवणुकीचा हिशेब ठेवणे /**

६.(१) बाजारात सूचीत केलेल्या गुंतवणूकींची किंमत करायची असेल तर त्यांचे वर्गीकरण खालील प्रमाणे करायचे असेल.

(अ) ट्रेझरी बिलसह सरकारी प्रतिभूती

(ब) सरकारने हमी दिलेले रोखे/प्रतिभूती

(क) बॅंक/सार्वजनिक वित्तीय संस्थांचे रोखे

(ड) कंपन्यांचे रोखे/कर्ज रोखे

(इ) म्युच्युअल फंडांची युनिटस.

प्रत्येक प्रकारची सूचित गुंतवणूकांचे मूल्यांकन लागत किंवा बाजार मूल्य यातील कमी असेल त्या इतके करण्यात येईल. या साठी प्रत्येक प्रकारच्या गुंतवणूकांचा स्क्रिप प्रमाणे विचार केला जाईल व प्रत्येक प्रकारची लागत व बाजार मूल्यांची बेरीज करण्यात येईल, निव्वळ घसाऱ्याचे प्रावधान केले जाईल किंवा तो नफा तोटा पत्रकामध्ये खर्ची टाकला जाईल. जर एकूण बाजार मूल्य एकूण लागत पेक्षा वाढली तर झालेली वाढ लक्षात घेतली जाणार नाही. एकाद्या प्रकारातील गुंतवणूकांच्या घसाऱ्याची दुसऱ्या प्रकाराच्या वाढीबरोबर जुळणी केली जाणार नाही

(२) सूचीत न झालेल्या सरकारी प्रतिभूती किंवा सरकारने हमी दिलेल्या रोख्यांचे मूल्यांकन त्यांच्या कॅरिंग कॉस्ट बरोबर केले जाईल

(३) म्युच्युअल फंडाची सूचीत न केलेल्या युनिटचे मूल्यांकन त्यांच्या निव्वळ मालमत्ता किमतीवर करण्यात येईल.

(अ) म्युच्युअल फंडाच्या युनिटमध्ये केलेल्या व सूचीत न केलेल्या गुंतवणूकीची किंमत त्या त्या फंडाने त्या त्या योजनेसाठी घोषीत केलेली निव्वळ मालमत्ता किंमत म्हणून धरली जाईल.

(ब) सूचित न झालेले समभागांचे मूल्यांकन लागत किंवा ब्रेक अप किंमती यातील कमी असेल ते, याला केले आहे. परंतु तारण हमी कंपन्यांना आवश्यकता वाटल्यास ब्रेक अप किमतीच्या ऐवजी योग्य (फेअर) किंमत घेऊ शकतात. जर ज्या कंपनीत गुंतवणूक करायची आहे त्या कंपनीचा ताळेबंद दोन वर्षासाठी उपलब्ध नसेल त्याच्या समभागाची किंमत एक रुपया धरली जाईल

(क) सूचीकृत न केलेल्या प्राथमिकत (प्रेफरन्स) समभागाची किंमत लागत किंवा दर्शनी किंमत या पैकी जे कमी असेल तेवढी केली जाईल,

सूचनाः सूची न केलेले कर्जरोखे हे मुदत किंवा पतव्यवस्था समजली जाईल. ते आय ओळखणे व मालमत्ता वर्गीकरण या कारणासाठी कर्जरोख्यांची मुदत किती आहे यावर अवलंबून असेल.

(पी.कृष्णमूर्ती)

प्रभारी मुख्य महाप्रबंधक.